


## वसंत दांडेकर

# अपूर्व देश - तिबेट






अपूर्व देश-तिबेट हे पुस्तक अपूर्व देश या सिरीजमधील तिसरे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचण्यापुर्वी याचा आधीचे भाग अपूर्व देश-जपान व अपूर्व देश-चीन वाचण्यासाठी खालील लिंक वापरा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/apurv_desh__japan_vasant_dandekar.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/apurva_desh_china_vasant_dandekar.pdf

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अपूर्व देश- तिबेट

(प्रवासवर्णन)

## लेखक : वसंत दांडेकर

# अपूर्व देश- तिबेट

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अपूर्व देश- तिबेट

लेखक :   वसंत दांडेकर

सम्पर्क- ई मेल -- dandekarv@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते. लेखक अमेरिकेतील असल्यामुळे ही केस अमेरिकेतील कोर्टामध्ये होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३० एप्रिल २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अपूर्व देश

# तिबेट

लेखकः

वसंत दांडेकर



# वसंत दांडेकर

जन्म : मुंबई, दादर शिवाजी पार्क.

गेले चाळीस वर्षे अमेरिकेत स्थायिक.

व्यवसायाने मेकॅनिकल आणि
इलेक्ट्रिकल इंजिनियर.

आता निवृत्त झालो आहे.

काल्पनिक साहित्यापेक्षा वस्तू-स्थितीवर आधारित साहित्य वाचायला आवडतं.

थोर लोकांची चरित्र वाचायला आवडतात.

हस्तकलेची आवड आहे.

प्रवास करणे करणे, फोटोग्राफी हे छंद आहेत.

काही कविता लिहिल्या आहेत.

हे तिसरं पुस्तक प्रकाशित होत आहे.

ताई आणि बाबूजी दांडेकर ह्यांना

सर्मपण

ज्यांना प्रवासाची आवड आहे

त्यांना हा मानाचा मुजरा

अनुक्रमणीका


भाग १०    तिबेट
- तिबेट रेल्वे
- तिबेटः ल्हासा
- नोर्बुलिंका राजवाडा
- रामोचे मंदीर
- ड्रेपुंग मॉनेस्ट्री
- पोटाला पॅलेस
- जोखांग मठ

भाग ११    चीन – शँघाय
- युयूआन गार्डन, ओल्ड टाऊन

भाग १२    हँगझाऊ

भाग १३
- शँघाय – बंड
- जेड बुद्ध मंदीर
- युयूआन गार्डन

# तिबेट रेल्वेः

तिबेट रेल्वेच्या कायद्या प्रमाणे ड्रायव्हरला व्हॅन लांब उभी करावी लागली. ट्रेनमध्ये खाण्याकरता खाद्य पदार्थ घेतले असल्याकारणाने आमचे सामान बरेच वाढले होते. आम्ही सहा जण पण आमचे १६ नग झाले होते. शिवाय शशीचे पिल्लू होतेच. स्टेशनवर सामान वाहून नेण्याची गाडी अथवा हमाल ह्या पैकी काहीच नव्हते. आता जास्त विचार करायला व शोधाशोध करायला वेळ नव्हता. मग मी व शशीने मोठ्या बॅगा घेतल्या व बाकीच्या मंडळींनी यथाशक्ती सामान घेतले, मायकेलने पण मदत केली व आमची वरात स्टेशनच्या दिशेने निघाली. तिकीट तपासतात तेथे आलो. ह्या ठिकाणी आमचे परमिट व तिकीटे तपासली आणि आम्हास आंत जाण्यास परवानगी मिळाली. तेथील सेक्युरिटीच्या बेल्टवर घालून बॅगा चेक केल्या. तेथून आंत जाण्याकरता दोन कठडे बांधले होते. त्यातील जागा अत्यंत अरुंद होती. मोठ्या बॅगा तेथून नेण्यास बरीच धडपड करावी लागली. मायकेलने सांगितले की समोरच वेटींग रूम आहे तेथे थांबा व तुमचा डबा त्याच्या समोरच येईल. आम्हाला जरा बरे वाटले कारण आता बॅगा व सामान जास्त हलवावे लागणार नव्हते. पण आमचा आनंद जास्त काळ टिकला नाही कारण आम्हास समजले की ट्रेन पलिकडच्या फलाटावर येऊन उभी आहे. पलिकडे जाण्यास जमिनी खालून बोगदा होता. आमच्या काळजाचा ठोकाच चुकला कारण सामान घेऊन हे उंच जिने उतरायचे व पलिकडे जाऊन परत चढायचे. बापरे... मनाचा हिय्या करून जीना उतरलो. वर चढतांना जिन्याच्या बाजूला अरुंद उतरंड होती. त्यावरून सरपटत बॅगा वर चढवल्या व फलाटावर आलो. आमच्या समोर १२ नंबरचा डबा उभा होता. आमचे रिझर्वेशन ५ नंबरच्या डब्यात होते. मग फलाटावरून आमची वरात ५ नंबरचा डबा शोधत निघाली. जसजसा एक एक नंबर कमी होत होता तसतसे आम्ही सुखावत होतो. फलाटावर प्रचंड गर्दी होती. त्यातून वाट काढत जाणे हे एक दिव्यच होते. मायकेल बरोबर होता म्हणून बरे होते. आम्ही डबे

मोजत होतो. १२ गेला ११ गेला करत करत ९,८ गेले आणि पुढच्या डब्यावर नंबरच नव्हते. हे काय गौडबंगाल आहे कळेना. मग समजले की तो जेवण्याचा डबा होता. शेवटी आला आमचा ५ नंबर. बाहेरच तिकीट चेकर होता त्याने आमची तिकीटे तपासली व आम्हास डब्यात चढण्याची परवानगी दिली. मी व शशीने आधी सर्व सामन डब्यात चढवून आमच्या कंपार्टमेंटमध्ये ठेवले. एका कंपार्टमेटमध्ये चौघांची झोपण्याची सोय होती. आम्हाला एक कंपार्टमेंट पूर्ण व दुसऱ्या कंपार्टमेंटमध्ये दोन बर्थ होते. सर्व दांडेकर म्हणजे मी, वर्षा, शशी व सुलभा एका कंपार्टमेंटमध्ये व खोपकर जोडपे दुसऱ्या कंपार्टमेंटमध्ये झोपायचे असे ठरले. डब्यात शिरल्यावर खोपकरांचे कंपार्टमेंट आधी आले. तेथे एक चीनी बाई रस्ता अडवून उभी होती. ती माझ्याशी चीनी भाषेत काहीतरी बोलली. अर्थात मला काहीच समजले नाही. तिची एक बॅग अर्धी आत व अर्धी बाहेर अशा अवस्थेत होती. मी व शशीने त्या बॅगेला व तिला आत ढकलून आमचा मार्ग मोकळा केला. आमच्या मोठ्या बॅगा बाकाच्याखाली जात नव्हत्या. सर्व सामन जमेल तसे आंत आणले व जेथे बसेल तेथे बसवले.

मायकेल कधी गायब झाला मला कळलेच नाही. त्याने खूप मदत केली. थोड्या वेळातच सर्व स्थानापन्न झालो. खोपकर मंडळी पण आमच्याच डब्यात येऊन बसली. वेळ झाल्यावर गाडीने निघायची शिट्टी दिली आणि गाडी तिबेटच्या दिशेने निघाली.

गाडी हलल्यावर आम्ही शांतपणे गप्पा मारायला बसलो. गप्पा मारता मारता शशीने मायकेलची नक्कल करण्यास सुरुवात केली आणि आमची हसता हसता मुरकुंडी वळली. आता ट्रेनमधील पुढचे तीन दिवस शशीच्या नकला हा मुख्य कार्यक्रम होता. रात्र झाली असल्या कारणाने थोडा वेळ गप्पा मारून श्री. व सौ. खोपकर त्यांच्या डब्यात झोपायला गेले.

मी आणि वर्षा खालच्या बर्थवर झोपलो होतो. रात्री शांत झोप लागली नाही. सकाळी जरा लवकरच उठलो. आमच्या डब्याच्या दोन्ही बाजूला संडास होते व एका बाजूला हात तोंड धुण्याकरता तीन बेसिनस् होती. बाथरूमला गेलो तेथे एक अंगावर जेमतेम वस्त्र असलेली चीनी तरुणी बेसीनमधल्या नळावर ओंजळीतून पाणी घेऊन आंघोळ करत होती. मला वाटले की मला बघून ती संकोचेल. पण मी तेथे गेलो तरी तिची आंघोळ व्यवस्थित चालू होती. तिला तोकडया कपड्यात वावरायची सवय असावी. मलाच लाज वाटली आणि मी पटकन आवरून परत गेलो.

जरा उजाडल्यावर बाहेरचे सृष्टी सौंदर्य दिसू लागले. अजून आम्ही सपाट भागातून चाललो होतो. हळू – हळू एक एक जण उठायला लागले. आज वर्षाचा वाढदिवस होता. तिला उठल्यावर हॅपी बर्थ डे विश केले. आपले आवरून खोपकर मंडळी आमच्या डब्यात आली. ब्रेकफास्टची वेळ झाली होती.



ट्रेनमधील ब्रेक फास्ट

बरोबर आणलेले पदार्थ खाल्ले. एवढे खाण्याचे पदार्थ आणले होते की आम्हाला ट्रेनच्या खाणावळीतून काही पदार्थ मागवण्याची गरज पडली नाही.

ट्रेन एकंदर स्वच्छ होती. फक्त संडास कमी होते. त्यामुळे तेथील बाथरूम रोल लवकर संपत असे. साफ करायला येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आम्ही लक्ष ठेवून असायचो कारण ते कर्मचारी नवीन बाथरूम टिशूचे रोल लावून जायचे. ते रोल संपायच्या आत बाथरूमला जाऊन यायचे.



तिबेट ट्रेनचा डबा



ट्रेन मधील अटेंडंट यांग

ट्रेनमध्ये आम्हाला वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडला नाही. गप्पा, पत्ते आणि तोंडी लावायला शशीच्या नकला. खोपकर मंडळी फक्त झोपण्याकरता त्यांच्या डब्यात जात होती.

ट्रेनमध्ये आमची देखभाल यांग जीन नावाची स्त्री अटेंडंट करत असे. तिने आमची चांगली देखभाल केली.



ट्रेनमध्ये पत्ते खेळणे हा प्रमुख उद्योग

एकदा सुलभाने तिला पुढच्या स्टेशनचे नांव विचारले. तिला काही तो प्रश्न समजला नाही. ती दुसऱ्या एका चीनी माणसाला घेऊन आली. हा गृहस्थ कॅनडात स्थाईक झाला होता व तेथून सहली काढत असे. त्याने दुभाष्याचे काम उत्तम केले. संभाषणातून त्यांना समजले की आम्ही यूएस मधून व बाकिची मंडळी ऑस्ट्रेलीयातून आली आहेत. यांगला आमच्या देशातील नाणी हवी होती ती मी व शशीने दिली. यांग ही आमच्या डब्यातील सर्वेसर्वा होती. ती तिकीट चेकर होती, आम्हाला लागेल ती मदत करणे, शिवाय कचरा काढणे इत्यादी कामेही तीच करत होती. ती आम्हाला पुढे येणाऱ्या स्टेशनची नावे देऊन गेली. परत थोड्या वेळाने ती दुभाषाला घेऊन परत आली. दुभाष्या

मार्फत तिने आम्हाला सांगितले की आज मध्यरात्रीपासून ट्रेन डोंगर चढायला सुरुवात करणार आहे. ट्रेन उंचीवर गेली की हवेतील प्राणवायूचा पुरवठा कमी होतो. ट्रेन मध्ये हवेतील प्राणवायूची पातळी कमी जास्त होऊ न देण्याची व्यवस्था आहे. पण जर आम्हाला प्राणवायू कमी आहे असे वाटले व आणखी प्राणवायूची गरज भासली तर आमच्या डब्यात असलेली जास्त प्राणवायूचा पुरवठा करणारी यंत्रणा तिने दाखवली व ती कशी वापरायची ते देखील दाखवले. त्याच बरोबर धूम्रपान करू नका, दारू पिऊ नका हे सांगायला विसरली नाही.

यांगने सांगितल्या प्रमाणे रात्री आम्ही झोपेत असतांना ट्रेनने डोंगर चढायला सुरुवात केली. मी सोडून बाकी सर्वांनी प्राणवायू कमी झाल्यावर शरीरावर परिणाम होऊ नये म्हणून गोळ्या घेतल्या होत्या. मी जरूर पडली तर घेणार होतो. सकाळी उठलो तेंव्हा आमची ट्रेन डोंगर चढत होती. बाहेरचे दृष्य फारच मनोहर दिसत होते.




तिबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा



निबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा



निबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा



निबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा



निबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा



निबेट ट्रेनमधून दिसणारा बाहेरचा देखावा

ट्रेन सकाळी ११:३० वाजता नामुतो सरोवराच्या परिसरात आली. यांगने सांगितल्या प्रमाणे आम्ही तिबेटमध्ये प्रवेश केला होता. नामुतो सरोवर हे तिबेटमधील तीन प्रमुख सरोवरांपैकी एक सरोवर आहे. दुपारी १२:१० वाजता नाचू नावाचे स्टेशन आले. साधारण ३ वाजता आम्ही बॅगा आवरण्यास सुरुवात केली. सामान भरपूर होते. मी व शशीने सर्व बॅगा आवरल्या व सुलभा आणि वर्षाने खाण्याचे सामान आवरले. सर्व सामान गोळा करून डब्याच्या दाराजवळ व मधल्या बोळखंडात ठेवले. तो सगळा भाग आमच्या बॅगांनीच भरून गेला. ४:३५ ला ट्रेन ल्हासा स्टेशन मध्ये आली. ट्रेन थांबल्यावर आम्ही भराभर आमचे सामान खाली काढले व आम्हास नेण्यास कोण येणार त्याची वाट बघत प्लॅटफॉर्मवरच थांबलो. बराच वेळ कोणी आले नाही. मग सामान घेऊन गर्दी ज्या दिशेने जात होती त्या दिशेने निघालो. आमचे १५ नग होते. नशिबाने तेथे सरकते जिने होते त्यामुळे जिन्यावर सामान नेण्याचा त्रास झाला नाही. येथे पण आम्हास बोगद्यातून जायचे होते. वर जाणारा जिना साधारण १०० यार्डावर होता. लहानपणी मी धावण्याच्या शर्यतीत भाग घेत असे. तेंव्हा १०० यार्ड मी १३ सेकंदात धावू शकत असे. तेच १०० यार्ड आज मैलासारखे वाटत होते व जायला किती वेळ लागेल ते पण कळत नव्हते. ते अंतर पार करून सरकत्या जिन्यावरून वर आलो. वर बाहेर जाण्याचा दरवाजा होता. तेथे आमच्या परमिटची व पासपोर्टची तपासणी झाली. तेथील एका इमिग्रेशनच्या कर्मचाऱ्याने आमचे पासपोर्ट व परमिट त्याचे जवळ ठेवून घेतले व आम्हास त्याचे बरोबर येण्यास सांगितले. तो आम्हाला घेऊन इमारतीच्या बाहेर आला. तेथे दूरवर एक कठडा होता. तेथे आमच्या सहल कंपनीचा गाईड आमच्या नावाचा फलक घेऊन उभा होता. आमचे सर्व लटांबर घेऊन आम्ही त्याचे जवळ गेलो. इमिग्रेशनच्या कर्मचाऱ्याने त्या गाईडची तपासणी केली. त्याचा नंबर व इतर पेपर्स तपासून बघितले. आमच्या परमिटवर गाईडची व सहल कंपनीची माहिती गाईडकडून भरून घेतली. आता त्या नवीन भरलेल्या माहितीसह परमिटच्या कॉपीज काढण्याची जरूर होती. गाइड आणि इमिग्रेशन कर्मचारी ह्यांचा बराच खल चालू होता. शेवटी तो कर्मचारी आमचे परमिट घेऊन त्याच्या ऑफीसमध्ये कॉपी

काढायला गेला. बाहेर ऊन रणरणत होते. ल्हासा भयंकर थंड असेल ह्या हिशोबाने आम्ही अंगावर भरपूर कपडे घातले होते. शेवटी आम्ही स्वेटर व जॅकेट काढून ठेवली. आम्हाला ताटकळत ठेवून तो कर्मचारी गायब झाला तो २० मिनीटांनी उगवला. आता आमचे परमिटचे सर्व काम झाले होते व तिबेटमध्ये जाण्यास मुभा होती.

तेथून आमची व्हॅन १५० यार्डावर होती पण तेवढेही चालण्याचे त्राण शिल्लक नव्हते. जड बॅग आधी उजव्या हातात मग डाव्या हातात मग परत उजव्या हातात असे करत करत हा चालण्याचा प्रवास संपवला.जाता जाता आय फोनवर तिबेटच्या रेल्वे स्टेशनचा फोटो मात्र घेतला.



तिबेट रेल्वे स्टेशन

व्हॅनमध्ये गेल्यावर सर्वांनी निश्वास टाकला. रेल्वे स्टेशनवर प्रवाशांच्या सोयींकडे केलेले दुर्लक्ष पाहून अचंबा वाटला.

# ल्हासा, तिबेटः

व्हॅन मध्ये बसून आम्ही हॉटेलकडे जाण्यास निघालो. जाताना ल्हासा शहराचे दर्शन होत होते. माझ्या तिबेट बद्दलच्या सर्व कल्पनांना तडा गेला. तिबेट हे हिमालयात वसलेले असल्यामुळे डोंगरातले रस्ते, घाटाचे रस्ते, डोंगर उतरंडीवर असलेली घरे असे चित्र मी डोळ्यासमोर उभे केले होते. पण आम्ही बघत होतो ते एक अद्ययावत शहर होते. सर्व बाजू डोंगरांनी वेढलेल्या ल्हासा शहराने मला वाईची आठवण करून दिली. मधल्या सखल भागात हे शहर वसलेले आहे. वाईपण असेच द्रोणासारखे वसलेले शहर आहे. चीनने तिबेटचा ताबा घेतल्या पासून ह्या शहराचा चेहरा मोहरा साफ पुसून टाकण्याचा चंग बांधला आहे. तिबेटची कोणतीही नामो निशाणी शिल्लक राहणार नाही ह्याची काळजी चीन घेत आहे. आश्चर्य हे की लोकशाहीचा डांगोरा पिटणारे बाकीचे जग डोळ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.

जपान व चीनपेक्षा येथे गलीच्छपणा जास्त जाणवला पण भारताच्या मानाने शहर स्वच्छ आहे. ल्हासा शहर फार मोठे नाही त्यामुळे साधारण १५ मिनीटात आपण शहरात कोठेही जाऊ शकतो. लवकरच आमचे हॉटेल आले. खोली ताब्यात घेऊन ७ वाजता जेवण्यास जायचे होते. खोलीत गेलो तर खोली गरम, एअर कंडिशनींग चालत नव्हते. खोलीतील पाणी पण चालू नव्हते. पण थोड्या वेळातच पाणी आले. आंघोळ करून निघालो. आमचा गाईड 'छोडेक' आम्हाला नेण्यास व्हॅन घेऊन आला होता. ल्हासा शहरातून आम्ही जात होतो, शहर जास्त दाटीवाटीचे वाटले. रस्त्यावर भरपूर मोटारगाड्या होत्या. कार पार्कींगची मोठी अडचण जाणवली. फुटपाथ रूंद असल्यामुळे कार फुटपाथवर उभी करून ठेवण्याची सोय होती. बऱ्याच कार्स फुटपाथवर  उभ्या केलेल्या दिसल्या.

आम्हाला उपहारगृहाच्या जवळ कार उभी करण्यास जागा मिळाली नाही. व्हॅन जरा लांब उभी करून चालत तिबेट स्टेक नावाच्या उपहार गृहात गेलो. तेथे बऱ्याच पद्धतींचे जेवण मिळते. आम्ही भारतीय पंजाबी पद्धतीचे जेवण मागवले. जेवण चविष्ट होते. भारत सोडल्या नंतर एवढे चविष्ट अन्न जेवल्याचे (घरचे सोडून) आठवत नाही. आम्हा सर्वांना जेवण खूपच आवडले, सर्वजण जेवणावर खुश दिसले. खोलीवर आल्यावर रात्री लवकर झोपलो. दुसरे दिवशी आराम होता. छोडेक सकाळी १० वाजता येणार होता.

# नोर्बुलिंका राजवाडाः

रात्री वर्षाला शांत झोप लागली नाही. तिची एक नाकपुडी सर्दीमुळे बंद झाली होती. आम्ही येताना विक्स व्हेपोरब आणायचे विसरलो होतो. सकाळी उठून न्याहरी करून १० वाजता लॉबीत गेलो. छोडेक आमची वाट बघत बसला होता.

आज प्रथम नोर्बुलिंका राजवाडा बघण्यास गेलो. ३७४ खोल्या असलेला हा राजवाडा क्यिचू नदीच्या काठावर बांधलेला आहे. हा राजवाडा बांधण्याच्या अगोदर येथे रानटी जनावरे, झुडपे व वेली ह्यांचे वास्तव्य असे. सातवे दलाई लामा ह्या भागास बरेच वेळा भेट देत असत. म्हणून चींगच्या न्यायाधिशाने येथे राजवाडा बांधला. ह्या राजवाड्याच्या भोवती ४३० हजार चौ. यार्ड परिसरात बाग केली आहे. सातवे लामा नंतरचे लामा उन्हाळ्यात येथे राहाण्यास येत असत. म्हणून ह्यास समर पॅलेस असेही म्हणतात.



नोर्बुलिंका राजवाड्याचे प्रवेशद्वार




प्रवेशद्वारासमोरील सिंह

राजवाड्यात प्रवेश केल्यावर समोरच एका गाडीत ८ माणसे बसू शकतील अशा काही गाड्या उभ्या होत्या. त्यात बसून राजवाडा बघण्याची सोय होती व त्याचे वेगळे तिकीट होते.



ह्या गाडीत बसून राजवाडा बघण्याची सोय होती

ह्या गाडीत बसून आम्ही फिरलो. येथे बरीच संकुले आहेत. ही संकुले म्हणजे दलाई लामांनी आपल्याकरता बांधलेले राजवाडे आहेत. सातव्या दलाई लामाने केलसांग पोटरँग बांधला, आठव्या दलाई लामाने सोकील पोटरँग बांधला नंतर असे आणखी राजवाडे बांधण्यात आले. काही महत्वाची ठिकाणे म्हणजे केलसांग पोटरँग, सोकील पोटरँग, गोल्डन लिंका पोटरँग, टाक्टेर मिगूर पोटरँग, चेंगसाल पोटरँग, कालसांग डेकील पोटरँग. आतून सर्व भाग बघता येतात पण फोटो घेण्यास बंदी आहे. बहुतेक सकुलांचा एकच साचा होता. बाहेर अंगण मग राजवाडा आणि मागे व पुढे बाग.



केलसांग पोटरँग



कालसांग डेकील पोटरँग

सोकील पोटरँग समोर फार सुंदर बाग आहे. तेथे बाहेर फोटो घेण्यास परवानगी होती.



नोर्बुलिंका राजवाडा

ह्या राजवाड्यातूनच सध्याच्या दलाईलामांनी पलायन केले. साध्या तिबेटी माणसाचा वेश घेऊन ते निघाले. दोन दिवसांनी चीन सरकारला त्यांच्या पलायनाची बातमी मिळाली पण तो पर्यंत उशीर झाला होता. दलाईलामां बरोबर त्यांचे काही अधिकारी होते. त्या वेळी धुळीचे वादळ चालू झाले त्यामुळे त्यांना कोणी ओळखू शकले नाही. दोन आठवडे हिमालयातून प्रवास करून त्यांनी भारतात प्रवेश केला. भारताने त्यांना राजकीय आश्रय दिला.



नोर्बुलिंका राजवाडा

राजवाड्यासमोर छान बाग केलेली आहे. तेथे काही फोटो घेतले.




राजवाड्या समोरच्या बागेत



राजवाड्या समोरच्या बागेत

नंतर गाडीत बसून प्रवेश द्वाराशी परत आलो. तेथून पुढे जेवणास गेलो. त्या उपहारगृहात याक प्राण्याचे मीट होते. शशीने व मी खाऊन बघितले. आम्हाला आवडले.

जेवण झाल्यावर रामोचे मंदीर बघण्यास गेलो.

# रामोचे मंदीरः

बाहेरच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच रामोचे मंदीर दिसते.



रामोचे मंदिर

हे मंदीर जोखांग मंदीराच्या बरोबरीनेच बांधले आहे. जोखांगचे मंदीर हे जोबो रिन पोचे ह्या मूर्तीकरता बांधलेले मंदीर आहे. जोबो रिन पोचे ही मूर्ती बौद्ध काळात विशकर्मा ह्याने तयार केली. असे म्हणतात की ह्या मूर्तीवर स्वतः बुद्धाचा वरदहस्त होता आणि बुद्धाच्या काळात अशा फक्त दोनच मूर्ती होत्या. एक मूर्ती बुद्धगया येथे आहे व दुसरी तिबेटमध्ये आहे.

७ व्या शतकाच्या पूर्वी चीनने भारताला एक कापड भेट दिले. ह्या कापडाला सुरुवात व शेवट नव्हता. त्याच्या बदल्यात भारताने चीनला जोबे रिन पोचेची मूर्ती दिली. ७ व्या शतकात तिबेटच्या राजाचा मंत्री 'गर टोन झेन' ह्याने राजाच्या चीनी नव परिणीत वधू 'वेनचेंग' हिला आपल्या वडिलांकडून ही मूर्ती आणण्यास सांगितले. वेनचेंग ही मूर्ती लाकडी गाडीतून घेऊन आली. पुढे चीन आक्रमण करेल ह्या भितीने तिने ही मूर्ती जोखांगमध्ये एका गुप्त खोलीत लपवून ठेवली. त्याचीच प्रतिकृती रामोचे मंदीरात स्थापन

केली आहे. ह्या मूर्तीला 'जोबो मिकयो डोर्जे' असे म्हणतात. ही मूर्ती विश्वकर्मा ह्याने केली असून नेपाळची राणी भ्रीकूती स्वतः ही मूर्ती तिबेटमध्ये घेऊन आली. स्वतः बुद्धाचा वरदहस्त लाभल्यामुळे ह्या दोन्ही मूर्ती अत्यंत पवित्र मानल्या गेल्या आहेत. तिबेटमधील सर्व धार्मिक व्यक्ती मृत्यू पूर्वी ह्या मूर्तींचे दर्शन घेण्याची इच्छा धरतात. आम्ही मंदीर आतून बघितले आणि बाहेरून प्रदक्षिणा घालायला गेलो. मंदीराभोवती प्रदक्षिणा घालण्यास जागा आहे. तेथे बरेच तिबेटी स्त्री व पुरूष साष्टांग नमस्कार घालत होते. तिबेटी लोकांची नमस्कार घालण्याची पद्धत भारतीय पद्धतीपेक्षा वेगळी आहे. जमिनीवर सहज सरकू शकतील अशी दोन कापडे नमस्कार घालताना वापरतात. आधी गुडघ्यावर



हातात धरण्याचे प्रार्थना चक्र

खाली बसतात. मग दोन हात बाजूला जमिनीवर ठेवतात. हाताखाली सरकती कापडे ठेवतात. सरकत्या कापडावर दोन्ही हाताचे पंजे ठेवतात. मग हात सरकवत पुढे नेऊन जमिनीवर लोटांगण घालतात. पुनः तसेच वर उठून गुढघ्यावर बसतात व मग परत उभे राहतात. सतत प्रार्थना करत राहणे हा तिबेटी लोकांचा धर्म आहे. चालता बोलता ही लोक प्रार्थना करत असतात. आपल्या कडे जशा जपमाळ असतात तशी ह्यांच्याकडे प्रार्थना चक्रे असतात.

ही प्रार्थना चक्रे वेग वेगळ्या मापाची असून हातात धरण्याची लहान चक्रे, तर देवळातून मोठी चक्रे टांगलेली असतात. हातातील चक्राला दोन साखळ्या असतात त्याच्या सहाय्याने हे चक्र गोल फिरवतात व फिरवताना देवाचा जप करतात.

मंदीरात असलेली प्रार्थना चक्रे ही चालता चालता एका हाताने फिरवायची असतात.



मंदिराच्या शेजारच्या आवारात असलेली प्रार्थना चक्रे शेजारी एक स्त्री साष्टांग नमस्कार घालत आहे

मंदीराला प्रदक्षिणा घालून आम्ही बाहेर निघालो. जाताना आवारात एक तिबेटी कुटुंब दिसले. त्यांचा एक फोटो घेतला.



मंदिराबाहेर बसलेले तिबेटी कुटुंब

छोडेक माहिती देत असतांना सतत भारताचा उल्लेख करत होता. त्यावरून भारताची व तिबेटची संस्कृती किती जवळ होत्या ह्याची कल्पना येते. तो बरेच संस्कृत शब्द तिबेटी उच्चारात सांगत होता. ते नीट समजत नव्हते पण त्याने पुनः सांगितल्यावर समजत असत.

# ड्रेपुंग मॉनेस्ट्रीः

मंदीर बघून आम्ही ड्रेपुंग मॉनेस्ट्री बघण्यास गेलो. येथे दररोज ३ वाजता भिक्षुकांचा सवाल जबाब कार्यक्रम असतो. तो बघण्यासारखा असतो. जातांना काही पायऱ्या आहेत त्या चढून गेल्यावर बरेच आंत चालत जावे लागते.



ड्रेपुंग मॉनेस्ट्री प्रवेशद्वार

तिबेटमध्ये बौद्ध विद्यापीठ असलेले तीन मठ आहेत. ड्रेपुंग, गॅनडेन आणि सेरा. पैकी ड्रेपुंग हा सर्वात मोठा मठ आहे. एके काळी येथे ७,००० ते १०,००० भिक्षुक शिकण्याकरता होते. चीनने तिबेट गिळंकृत केल्यापासून येथे कायम चीनी सैनिकांचा पहारा असतो. त्यामुळे ह्या मठाचे महत्व आता कमी झाले आहे.

वाटेत गँगडेन पोडांग हा राजवाडा आहे. येथे पाचव्या दलाई लामांपर्यंतच्या लामांचे वास्तव्य होते. पुढे पोटाला राजवाडा बांधल्या नंतर दलाई लामांचे वास्तव्य पोटाला राजमहालात स्थलांतरीत झाले.

चीनने तिबेट गिळंकृत केल्यानंतर त्यांनी तिबेटची संस्कृती नष्ट करण्यास सुरुवात केली आहे. त्यात ४0 टक्के मठ नष्ट केले गेले. बौद्ध भिक्षुकांनी चीन विरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला पण चीनने तो निर्दयपणे चिरडून टाकला.

आम्ही नंतर सवाल जबाब बघण्यास गेलो. त्या ठिकाणी भिक्षुक ५ ते ६ च्या गटात बसले होते. एकजण प्रश्न विचारून स्वतःच्या एका हाताने दुसऱ्या हातावर टाळी देत असे व इतर भिक्षुक त्यास उत्तर देत असत.



हातावर टाळी देत सवाल विचारतात

सवाल जबाबाच्या ठिकाणी सर्वत्र चीनी सैनिक पहारा देत होते. तिबेटी भिक्षुकांनी उठाव केल्या पासून चीन सरकारने तिबेटी नागरिकांचे सर्व स्वतंत्र हीरावून घेतले आहे. सर्वत्र तिबेटी नागरिकांवर सतत सैनीकांचा पहारा असतो. चीन सरकारने बऱ्याच तिबेटी लोकांना नाना प्रकारची प्रलोभने दाखवून फोडले आहे. त्यामुळे तिबेटी लोकांना सुद्धा आपला कोण व चीन सरकारला फितूर झालेला कोण हे कळेनासे झाले आहे. चीनच्या सैनिकांचा फोटो घेण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे फोटो घेतांना चीनी सैनिक फोटोत येणार नाही ह्याची काळजी घ्यावी लागते. तेथे थोडावेळ बसून आम्ही परत आलो. खोलीवर थोडा आराम करून जेवण्यासाठी बाहेर पडलो. चालतच समोरच्या एका उपहारगृहात गेलो. हे उपहारगृह म्हणजे एक जुगार खेळण्याचे ठिकाण होते. सोंगट्यांचा खेळ खेळत होते. प्लॅस्टिकच्या वाटीत फासे ठेवून ते खुळखुळवतात व मग ती वाटी पटावर उपडी टाकतात. त्या फाशांप्रमाणे सोंगट्या हलवून हा खेळ खेळतात. वाटी उपडी टाकतांना ती जोरात आपटतात. कारण कळले नाही पण जोरात आपटल्या मुळे फासे आपला नंबर बदलतात असा त्यांचा समज असावा. आम्ही जास्त चिकित्सा केली नाही. खेळणारी मंडळी सिगरेट व दारूचा यथेच्छ समाचार घेत होती. तिबेटमध्ये धुम्रपान करण्यास कोठेही मज्जाव नाही. कदाचित हवा थंड असते म्हणून धुम्रपान ही आवश्यक गोष्ट असावी. त्या उपहारगृहात धुम्रपानाचा उग्र वास सर्वत्र पसरला होता. जेवताना अशा वासाचा मला त्रास होतो. मी जेवण लवकर आटपून बाकीच्यांचे होइपर्यंत बाहेर रस्त्यावर फेर फटका मारत होतो.

मी ऑक्सीजनच्या गोळ्या घेतल्या नव्हत्या परंतु तिबेटमध्ये आल्यापासून ऑक्सीजनचा पुरवठा कमी असल्यामुळे थकवा लवकर येतो असे मला जाणवत होते. तिबेटमधील लोकांची वृत्ती ही दुसऱ्याबद्दल बेपर्वा वाटली. पण ही वृत्ती मूळ तिबेटी प्रजेची नसून येथे येणाऱ्या चीनी लोकांची होती. मूळ तिबेटी प्रजा अत्यंत धर्मवत्सल आहे. दलाईलामा हे त्यांचे श्रद्धास्थान आहे. त्यांच्या सल्ल्या प्रमाणे प्रजा आचरण करत असते.

एका हातात सतत प्रार्थना चक्र घेऊन ही मंडळी वावरत असतात. दोन वेळचे खाणे मिळावे एवढीच त्यांची अपेक्षा असते. जास्त लोभ ही मंडळी ठेवत नाहीत. चीनने त्यांची सर्व समीकरणे बदलून टाकली. त्यांच्या दलाईलामाला पळ काढावा लागला. चीनने ठरवलेलाच दलाईलामा येथे कारभार करतो. त्याचा स्वीकार ह्या प्रजेने केला नाही. पण चीनला त्याची फिकीर नाही. चीनने तिबेट रेल्वे बांधली त्याचा उद्देश एकच होता. चीनी लोकांची प्रजा येथे वाढवायची व तिबेटी प्रजा संपवायची. सध्या तिबेटी व्यक्तीला दुसऱ्या तिबेटी व्यक्तीबरोबर लग्न करता येत नाही. त्याचा परिणाम म्हणजे ह्याच्या पुढे तिबेटी प्रजा वाढणार नाही. चीन सरकारने तिबेट व्यापल्यापासून तिबेटी लोकांचे उद्योगधंदे बंद करून टाकले. सर्व उद्योगधंदे चीनी लोकांच्या हातात दिले जात आहेत. तिबेटी लोकांना नोकऱ्यांवरून काढून टाकून चीनी लोकांची भरती केली जात आहे. आता तिबेटी लोकांना नोकऱ्या मिळणे कठीण होत आहे. चीनी लोकांना येथे भरमसाठ सवलती दिल्या जातात. एकंदर तिबेटी लोकांचे खच्चीकरण चीन करत आहे  आणि आश्चर्य म्हणजे बाकी सर्व राष्ट्रे मुग गिळून गप्प बसली आहेत. चीनला सेक्युलॅरिझमचा अर्थ कोणी सांगितलेला दिसत नाही. भारतातल्या काही महारथींना सेक्युलॅरिझमचा अर्थ चीनला समजाऊन सांगण्यास पाठवून दिले पाहिजे.

खरे म्हणजे ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. तिबेटकडे ह्या स्वार्थी राष्ट्रांना देण्यासारखे काही नाही. तिबेटमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक तत्वज्ञान आहे. पण जगाला त्याची किंमत नाही. तिबेटमध्ये जर तेलाच्या खाणी सापडल्या असत्या तर अमेरिकेसह सर्व स्वार्थी राष्ट्रे तिबेटच्या मदतीला धावून आली असती.

विचार करत खोलीवर परत आलो. खोली गरम होती. चीनी हॉटेल असल्यामुळे त्यांना आमची म्हणजे गिऱ्हाइकांची पर्वा नव्हती. त्या हॉटेलमध्ये काही चीनी शिष्टमंडळे आली होती. त्यांची सेवा करण्यात हॉटेलचे कर्मचारी गुंतले होते. ह्या हॉटेलच्या दोन इमारती होत्या. त्यापैकी एकाच इमारतीत इंटरनेट चालू ठेवत असत. आत्तापर्यंत आम्ही

ज्या इमारतीत होतो तेथे इंटरनेट उपलब्ध असे. पण चीनचे शिष्टमंडळ आल्यानंतर ज्या इमारतीत शिष्टमंडळ असेल तेथेच इंटरनेट चालू ठेवत असत. मग आम्हाला इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा फेऱ्या माराव्या लागत असत.

हॉटेलच्या कर्मचाऱ्यांजवळ तक्रार करून थकलो पण काही फरक पडला नाही. दुसरे दिवशी पोटाला राजवाडा बघण्यास जाणार होतो. रात्री शांत झोप लागली नाही. दुसरे दिवशी उशीरा म्हणजे ६॥ वाजता उठलो. प्रथम थोडे आवरून लॉबीत गेलो. इंटरनेटवर मेसेजेस चेक केले. जरूर त्यांना उत्तरे पाठवली. परत खोलीत येऊन बाकीचे आवरले. खाली जाऊन न्याहरी घेतली. हॉटेलची न्याहरीची जागा इंटरनेटप्रमाणे रोज बदलत असे. १० वाजता लॉबीत आलो. च्छोडेक येऊन आमची वाट बघत होता. सर्वजण आल्यावर व्हॅनमध्ये बसून पोटाला पॅलेस बघण्यास निघालो.

# पोटाला पॅलेसः

छोडेकने आम्हाला आधीपासूनच भिती घालून ठेवली होती की आपल्याला बरेच चढायचे आहे. आम्ही मनाची तशी तयारी करून ठेवली होती. आम्हाला ११ वाजताचे तिकीट मिळाले होते. १० वाजता आम्ही निघालो. पॅलेसच्या पार्किंग लॉटमध्ये व्हॅन उभी करून आम्ही जेथे प्रवेश द्वार होते तेथे चालत गेलो. जाताना विक्रेत्यांची झुंबड बरोबर घेऊन जात होतो. त्या शिवाय गत्यंतरच नव्हते कारण विक्रेते मागे हटायला तयारच नव्हते. वाटेवर बरीच मंडळी चालताना दिसत होती. ही मंडळी राजवाड्याच्या पायथ्या भोवती प्रदक्षिणा घालतात व नंतर राजवाड्याच्या पायथ्याशी एक नाका आहे तेथे जमतात व जरासे संथ असे नृत्य करतात. हा त्यांच्या व्यायामाचा एक प्रकार आहे.



राजवाड्याच्या पायथ्या भोवती प्रदक्षिणा घालून येथे नृत्य करतात

प्रदक्षिणा घालण्यास साधारण २० मिनीटे लागतात. आम्ही काही प्रदक्षिणा घातली नाही. चालत प्रवेश द्वारापाशी गेलो. तेथे आमच्या पासपोर्टची तपासणी झाली. तिकीटे ताब्यात घेऊन निघालो. चढण सुरू होण्यास अजून पुढे जायचे होते. पॅलेसचे बाहेरून फोटो काढले. आत काढण्यास परवानगी नाही.



पोटाला पॅलेस



पोटाला पॅलेस

बाहेरून ह्या पॅलेसचे पांढरा व लाल असे दोन भाग दिसत होते. पांढऱ्या रंगाच्या भागात दलाई लामा रहात असत व लाल भागात सर्व धार्मिक अभ्यास, संशोधन. धार्मिक पुस्तक संग्रह ह्यांचा समावेश होता.



पोटाला पॅलेस

राजवाडयाच्या पहिल्या भागात जाण्याकरता १५0 पायऱ्या चढून जावे लागले. पायऱ्या तेवढ्या कठीण नव्हत्या. कदाचित आमच्या मनाची तयारी झाली होती म्हणून कठीण वाटल्या नाहीत. उंचीवरून खालचे सौंदर्य छान दिसत होते.

पोटाला राजवाड्यात दलाई लामा रहात असत. १९५९ मध्ये १४ व्या दलाई लामाने भारतात पलायन करेपर्यंत दलाई लामांचे येथे वास्तव्य असे. ड्रेपुंग आणि सेरा मठांच्या मध्ये असलेली ही जागा सरकारी कामा करता व दलाई लामांना राहण्याकरता आदर्श आहे असे सांगण्यात आल्यामुळे ५ व्या दलाई लामांनी १६४५ साली हा राजवाडा बांधण्यास सुरुवात केली व तीन वर्षात बाहेरील वाडा बांधून तयार झाला. ५ वे दलाई लामा १६४९ साली येथे राहण्यास गेले.

पोटाला राजवाड्याच्या पायालगतच्या भिंतीची पूर्व – पश्चिम लांबी ४00 मि. उत्तर – दक्षिण लांबी ३५0 मी  आहे. पाया खणतांना त्यात तांबे वितळवून घातले त्यामुळे धरणीकंपात इमारतीला धक्का पोहोचत नाही. १३ मजली वाड्यामध्ये १000 खोल्या असून २ लाखाच्यावर पुतळे आहेत. ह्या राजवाड्याची डोंगरावरची उंची ३८५ फूट व

जमिनीपासूनची उंची १ हजार फूट आहे. समुद्रसपाटी पासूनची १२,१०० फूट आहे. मारपोरी ह्या पर्वताच्या एका बाजूला हा राजवाडा बांधला असून त्याच्या भिंती सुद्धा डोंगरासारख्या वर निमुळत्या होत गेलेल्या आहेत.



पोटाला राजवाड्याच्या पायऱ्या चढतांना उंचीवरून दिसणारे पीसफुल लिबरेशन मॉन्युमेंट



अशा १५० पायऱ्या चढून आम्ही पहिल्या राजवाड्यात प्रवेश केला



मध्येच थोडी विश्रांती घेत चढत होतो



बापरे अजून किती चढायचे आहे?



मी अजून दमले नाही

१५० पायऱ्या चढून गेल्यावर आम्हाला पुनः तिकीट काढावे लागले व पुनः पासपोर्टची तपासणी झाली. आम्ही राजवाड्यात प्रवेश केला. समोरच मोठा चौक होता. त्याला वळसा घालून आम्हाला आणखी १०० पायऱ्या वर जाऊन लाल राजवाडा लागणार होता.

त्या चौकाला वळसा घालून जातांना तेथे एक धर्मगुरू आले. आमच्या आजुबाजूला जे धार्मिक लोक होते ते त्यांच्या पाया पडले.



तेथे एक धर्मगुरू आले

त्यानंतर आम्ही आणखी १०० पायऱ्या चढून लाल वाड्यात गेलो. सुलभाने पायऱ्या मोजण्यात खंड पाडला नाही. लाल वाड्याचा भाग फारच गोंधळात टाकणारा आहे. एकात एक खोल्या, काही खोल्या वर तर काही खोल्या खाली, चढ उतार करणारे जिने, त्यांना जोडलेल्या गॅलऱ्या सगळी चक्रव्युहाची रचना.

लाल किल्ल्याच्या मधोमध एक मोठा हॉल आहे. त्याला पश्चिमेचा मोठा दिवाणखाना म्हणतात. त्याच्या भिंतींवर मोठी चित्रे आहेत. ५ व्या दलाई लामांच्या आयुष्यातले काही प्रसंग चितारलेले आहेत. ह्या हॉलच्या उत्तरेला संताचे देऊळ आहे. ही पवित्र जागा असून येथे अवलोकीतेश्वराचा पुतळा आहे. तेथे एक बोळ आहे जो पुढे एका गुहेत जातो. त्या गुहेत तिबेटचा सम्राट सॉंगस्टन गाम्पोने बौद्ध धर्माचा अभ्यास केला असे म्हणतात. तेथे त्याचा, त्याच्या बायकांचा व धर्मगुरूचा असे पुतळे आहेत.

त्याला लागून उत्तरेचे देऊळ आहे. तेथे सांख्यमुनी व ५ व्या दलाई लामांचे सिंहासनावर बसलेले पुतळे आहेत. तेथेच ११ व्या दलाई लामांच्या नावे उभारलेला सोनेरी स्तूप व थडगे आहे.

दक्षिणेकडे असलेल्या देवळात पद्मसांभव व त्याच्या दोन बायकांचे पुतळे आहेत. पुर्वेच्या देवळात सॉंग खापाचे पुतळे आहेत. पश्चिमेकडील देवळात बरेच मोठे स्तूप आहेत. चंदनाच्या स्तूपवर सोन्याचे कवच आहे.

ह्या राजवाड्यात असंख्य दालने व असंख्य पुतळे आहेत. बौद्ध धर्मात पुतळ्यांना फारच महत्व आहे. बाकी कोणत्याही धर्मात एवढे पुतळे आढळत नाहीत.

सर्व राजवाडा बघून परत निघालो व उतरंडीला लागलो. आत्तापर्यंत दमल्यासारखे वाटत नव्हते. दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती व त्यामुळे भूक लागली होती. काल गेलो होतो तेथेच परत जेवण्यास गेलो. आम्ही परत पंजाबी जेवण केले.

# जोखांग मठः

उपहार गृहाच्या समोरच जोखांग मठ आहे तो बघण्यास गेलो. तेथे जातांना बाजारातून जावे लागते. बाजारातल्या वस्तू बघत बघत गेलो. त्या भागाला बाखोर म्हणतात. मठासमोर मोठा चौक आहे.



जोखांग मठा समोरील चौक



जोखांग मठ

त्या मठात काही स्त्री पुरूष साष्टांग नमस्कार घालत होते. मी त्यांचा व्हिडीओ घेण्याचा प्रयत्न केला पण लगेचच एक चीनी सैनीक धावत माझ्या जवळ आला व त्याने मला व्हिडीओ घेण्यास बंदी केली.



जोखांग मठात प्रार्थना करत असलेली एक महिला



वाटेत भेटलेली एक तिबेटी स्त्री

भारतीय बुद्धविहार पद्धतीने हा मठ बांधला आहे. ही तिबेटमधील सर्वात पवित्र जागा. सॉंगसान गाम्पोच्या काळात हा मठ बांधला आहे. जोबो रिन पोचे ची मूर्ती येथे आहे.

हा मठ बघून त्याच्या शेजारी व भोवताली असणाऱ्या रस्त्यावर फिरण्यास गेलो.

वाटेत एक देऊळ लागले. तेथे एक प्रचंड मोठे प्रार्थना चक्र होते. येथे येणारे भाविक मोठ्या भक्तिभावाने हे चक्र फिरवत होते.



देवळात असणारे प्रचंड प्रार्थना चक्र





तिबेटी स्त्री



जोखांग मठा शेजारील रस्ता



एक तिबेटी दुकान

जोखांग मठाच्या भोवती चक्कर मारून आम्ही परत मठा जवळ आलो. परतीच्या वाटेवर बाजार होता. तेथे आम्ही पुरूषांचा एक व स्त्रियांचा एक असे दोन गट केले.  आम्ही पुरूष बाजारातून फिरलो. मी एक प्रार्थना चक्र विकत घेतले व चारूने स्वतःचे एक विनोदी चित्र काढून घेतले. आम्ही रस्त्याच्या शेवटी एका झाडाच्या पारावर येऊन स्त्री गटाची वाट पहात थांबलो.



बारखोर येथील बाजार

आम्ही बराच वेळ तेथे बसलो होतो पण स्त्रियांची खरेदी काही संपत नव्हती.



स्त्रि गटाची खरेदी काही संपत नव्हती

शेवटी आणखी बऱ्याच वेळाने आपल्या हातातील कंकणे दाखवत स्त्रियांनी आम्ही बसलो होतो तेथे प्रवेश केला.



शेवटी शॉपीग संपले

आम्हाला वाटले की भरलेल्या पिशव्या आमचे जवळ ठेऊन मंडळी परत खरेदीला जाणार. पण नाही. त्यांची खरेदी संपली होती. व्हॅनमध्ये बसून परत हॉटेलवर आलो. नेहमी प्रमाणे आमच्या इमारतीतले इंटरनेट चालू नव्हते. शेजारच्या इमारतीत जाऊन इमेलस् चेक केली. जरूर त्यांना उत्तरे पाठवली, वर्षाने झी टिव्हीवर चालू असलेली मराठी मालिका बघितली. ७ वाजता परत आमच्या नेहमीच्या जेवण्याच्या ठिकाणी गेलो. परत येताना थोडी फळे व पाण्याच्या बाटल्या विकत घेतल्या. दुसरे दिवशी दुपारी ३।। वाजता विमानाने शँघायला जायचे असल्यामुळे  हॉटेलमधून १२ वाजता निघायचे होते. रात्री बरेचसे सामान आवरून झोपलो.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

esahity@gmail.com